आरबीआय/२००९-१०/२०२
डीबीओडी. एलईजी. क्र. बीसी. ५५/०९.०७.००५/२००९-१० ऑक्टोबर ३०,२००९

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका
(आरआरबी सोडून)

महोदय,

<u>अकार्यकारी खाती</u>

कृपया आमचे ''ग्राहकसेवे'' वरील महापरिपत्रक डीबीओडी. क्र. एलईजी. बीसी. ९/०९.०७.००६/२००९-१० दि. जुलै १,२००९ च्या परिच्छेद २४.२(४) चा संदर्भ घ्यावा, त्यानुसार, एखाद्या बचत किंवा चालु खात्यात दोन वर्षांच्या काळात कोणताही व्यवहार न झाल्यास ते बचत/चालु खाते अकार्यकारी खाते समजले जावे. ह्याशिवाय, परिच्छेद २४.२ (६) अनुसार, एखाद्या खात्याचे वर्गीकरण अकार्यकारी असे ठरविण्यासाठी, ग्राहकाच्या वतीने केले गेलेले दोन्हीही प्रकारचे व्यवहार, म्हणजे, क्रेडिट व डेबिट व्यवहार तसेच तृतीय पक्षाव्दारे केल्या गेलेल्या व्यवहारांचाही विचार केला गेला पाहिजे.

२) असेही काही प्रसंग असतील की जेथे ग्राहकाच्या स्थिर ठेवीवरील व्याज त्याच्या बचत खात्यात जमा करण्यासाठी ग्राहकाने मँडेट दिले असेल व त्या बचत खात्यात ह्याशिवाय अन्य कोणताही व्यवहार होत नसेल. असे खाते दोन वर्षांनंतर अकार्यकारी ठरवले जावे काय ह्याबाबत काही शंका निर्माण झाल्या आहेत.

३) ह्या संदर्भात आम्ही येथे स्पष्ट करीत आहोत की, ज्याअर्थी, ग्राहकाने दिलेल्या मँडेट अनुसार त्याच्या स्थिर ठेवीवरील व्याज त्याच्या बचत खात्यात जमा केले जात आहे त्याअर्थी जो व्यवहार ग्राहकाने/त्याच्या वतीने केलेला व्यवहार समजला जावा. त्यामुळे जोपर्यंत स्थिर ठेवीवरील व्याज ग्राहकाच्या बचत खात्यात जमा केले जात आहे तोपर्यंत ते बचत खाते कार्यकारी खाते समजले जावे. स्थिर ठेवीवरील व्याज जमा झाल्याची शेवटची नोंद केली गेल्यावर दोन वर्षांनी ते बचत खाते अकार्यकारी समजले जावे.

आपला,

(बी महापात्रा)
मुख्यव्यवस्थापक.